

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – पाचवी (21 जून) विषय – मराठी

Subscribe

# शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

## मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट

- खालील अनुभव वाचा. तुम्हाला आलेला अनुभव वहीत लिहा.

टेस्ट सोडवा



**चला, वाचूया.**

### वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार

नाशिकमधील बापू गायधनी यांनी भीषण आगीतून लहान मुलांना आणि जनावरांना वाचवले. त्यासाठी त्यांनी स्वतःचा प्राण गमावला. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या त्यांच्या या अतुलनीय शौर्याच्या स्मरणार्थ, स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणाऱ्या शूर मुलामुलींना 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' दिला जातो. दरवर्षी असे जास्तीत जास्त तीन पुरस्कार दिले जाऊ शकतात.

'राष्ट्रीय बालकल्याण परिषदेच्या' वतीने दिले जाणारे हे शौर्य पुरस्कार स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीने दिले जातात. रोख रक्कम, पदक आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असते. कोणत्याही वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत पुरस्कारासाठी नावे पाठवावी लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात गौरवाने सहभागी करून घेतले जाते.

पुरस्कारप्राप्त मुलामुलींना गरज असल्यास त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, तसेच व्यावसायिक उच्च शिक्षणासाठी परिषदेच्या वतीने मदत केली जाते. त्यासाठी या धाडसी मुलांची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांमार्फत परिषदेकडे केली जाते.



वीर बापूराव गायधनी यांच्या शौर्याची काल्पनिक चित्रे

## बेरीज करा.

टेस्ट सोडवा

### चार अंकांपर्यंतच्या संख्यांची बेरीज

**स्वाध्याय**

बेरीज करा.

(१) ५६४२ + ४१७९

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ५ | ६ | ४ | २ |
| + ४ | १ | ७ | ९ |
| | | | |

(२) ४९८४ + ७७५

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ४ | ९ | ८ | ४ |
| + | ७ | ७ | ५ |
| | | | |

(३) ७८५० + २९

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ७ | ८ | ५ | ० |
| + | | २ | ९ |
| | | | |

(४) ५६८९ + १३५ + ८७

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| + | | | |
| + | | | |
| | | | |

(५) ७ + ४८९५ + १३७

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| + | | | |
| + | | | |
| | | | |

(६) २३९ + ५३१० + ३०

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| + | | | |
| + | | | |
| | | | |

◆ बेरीज करा : ६७८५ + ७४५३

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ६ | ७ | ८ | ५ |
| + ७ | ४ | ५ | ३ |
| | | | |

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| | १ | १ | | |
| + | ६ | ७ | ८ | ५ |
| | ७ | ४ | ५ | ३ |
| १ | ४ | २ | ३ | ८ |

प्रथम संख्यांची उभी मांडणी करू.
एककांत एकक मिळवू. ५ + ३ = ८
आता दशकांत दशक मिळवू.
८ द + ५ द = १३ द
१३ द म्हणजे १ श ३ द
१ श हातचा आला. ३ द उरले.
आता ७ श + ४ श = ११ श
११ श + हातचा १ श = १२ श
१२ श म्हणजे १ ह २ श
१ ह हातचा आला, उरले २ श.
आता ६ ह + ७ ह = १३ ह
१३ ह + हातचा १ ह = १४ ह

प्रत्येक स्थानाच्या खाली एकच अंक लिहितात, यावरून १४ ह म्हणजे १ दशहजार व ४ हजार. यातील १ साठी नवे स्थान निर्माण करू. दशहजाराचे स्थान 'दह' असे दाखवू.
बेरीज आली १४२३८.

टेस्ट सोडवा

## Add.

### Addition of four-digit numbers

**Exercise**

Add.

(1) 5642 + 4179

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 5 | 6 | 4 | 2 |
| + 4 | 1 | 7 | 9 |
| | | | |

(2) 4984 + 775

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 4 | 9 | 8 | 4 |
| + | 7 | 7 | 5 |
| | | | |

(3) 7850 + 29

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 7 | 8 | 5 | 0 |
| + | | 2 | 9 |
| | | | |

(4) 5689 + 135 + 87

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| + | | | |
| + | | | |
| | | | |

(5) 7 + 4895 + 137

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| + | | | |
| + | | | |
| | | | |

(6) 239 + 5310 + 30

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| + | | | |
| + | | | |
| | | | |

◆ **Add : 6785 + 7453**

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 6 | 7 | 8 | 5 |
| + 7 | 4 | 5 | 3 |
| | | | |

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| | 1 | 1 | | |
| | 6 | 7 | 8 | 5 |
| + | 7 | 4 | 5 | 3 |
| 1 | 4 | 2 | 3 | 8 |

First, we arrange the numbers vertically.
Add units to units. 5 + 3 = 8
Add tens to tens. 8T + 5T = 13T
13T means 1H and 3T.
Carry over the 1 H. 3 T remain.
Now, 7 H + 4 H = 11 H.
11H + 1H carried over = 12H.
12H means 1Th and 2H. Carry over 1Th. 2H remain.
Now, 6Th + 7Th = 13Th
13Th + 1Th carried over = 14Th.
Now, only one digit is written in each place.

Since 14Th means 1TTh and 4Th, we make a new place for the ten thousand. The new place will be marked 'TTh'.
The sum of the two numbers is 14238.

टेस्ट सोडवा

Read, speak and write.

(वाचा, बोला आणि लिहा.)

## A GARDEN OF WORDS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| am | feeling | long | red | tree |
| another | fresh | lovely | run | under |
| are | full | mango | see | us |
| ate | good | nap | sleepy | vegetable |
| behind | have | once | slept | very |
| carrot | he | patch | slow | walked |
| did | I'll | race | slowly | white |
| didn't | leafy | radish | so | wins |
| eat | let | ran | stop | woke |
| fast | little | reached | then | you |

**1. Listen carefully and tick off the words.**

* ate * did * eat * full * good * let * long
* nap * run * stop * tree * very * white * wins

**2. Find these words and copy them down.**

* Words that end with 'y'. * A word that begins with 'y'.
* Words that have 'double' letters. * Words that have the 'ॲ' sound.
* Words that have g an le ed sl .

**3. Select one word at a time. Look at the word carefully. Then close your eyes and think of the word. Write down the word. Look at it again. Is it right ? Look it up in the textbook. Learn five words at a time in this way.**

वरील प्रत्येक शब्दासाठी 8 x 4 cm किंवा अन्य आकारात जाड कागदाची कार्डे प्रत्येक मुलाकडून करून घ्यावीत व ती मुलांजवळच ठेवावीत. त्या शब्दांवर आधारित येथे दिलेले उपक्रम अशा कार्डांच्या साहाय्याने घेणे अधिक चांगले. वर्गातील अध्यापनाशिवाय इतर वेळीही या उपक्रमांचा गटात/एकट्याने सराव करण्यास मुलांना प्रोत्साहन द्यावे.

खालील उतारा वाच व समजून घे. टेस्ट सोडव.

टेस्ट सोडवा

### करून पहा

- किराणा दुकानातून रिठे आणा. ते कोमट पाण्यात भिजवा. ते पाणी ढवळा. पहा बरं काय होते ते.
- कपडे धुण्याचा सोडा कोमट पाण्यात घाला व पाणी ढवळा. काय होते ते पहा.
- आता या पाण्यात अस्वच्छ कपडे भिजत ठेवा.
- अर्ध्या तासाने हे कपडे धुऊन घ्या.
- पहा बरं कपडे स्वच्छ झाले का ?

- रिठा, सोडा, हिंगणबेट, चुनखडी इत्यादींचा वापर कपडे धुण्यासाठी करता येतो. या सर्व नैसर्गिक वस्तू आहेत.

### सांगा पाहू

- तुम्ही पहिलीत असतानाचे कपडे आता वापरता का ?
- वापरत नसल्यास, कोणते कपडे तुम्ही आता वापरता ?
- पूर्वीचे कपडे आता न वापरण्याचे कारण काय ?
- लहान असताना तुम्हांला अत्यंत आवडलेला एखादा ड्रेस तुम्ही आता का वापरू शकत नाही?
- तुम्ही वापरत नसलेल्या कपड्यांचे काय होते ?
- आई–वडील, आजी–आजोबा यांच्याशी चर्चा करा. जुन्या कपड्यांचे काय होते, ते विचारा.

### करून पहा

- **जुने कपडे देऊन नवीन भांडी मिळतात, हे तुम्हांला माहीत आहे का ? जुन्या कपड्यांच्या बदल्यात नवीन भांडी देणाऱ्या व्यावसायिकांशी चर्चा करा. त्यासाठी खालील मुद्दे वापरा.**

(१) जुने कपडे घेऊन त्याचे काय करता ?
(२) या कपड्यांतील चांगले कपडे व फाटके कपडे वेगवेगळे केले जातात का ?
(३) चांगल्या कपड्यांचे काय केले जाते ?
(४) ते कोण घेतात?
(५) फाटलेल्या कपड्यांचे काय केले जाते ?
(६) काही कपडे स्वत:साठी ठेवतात का ?
(७) जुने कपडे घेऊन नवीन भांडी देणे त्यांना कसे परवडते ?



तुम्ही मिळवलेल्या माहितीची नोंद करा. तुमच्या नोंदी पुढील माहितीशी जुळतात का, ते पहा.

- कपडे हे टिकाऊ असतात. ते जुने झाले, तरीही त्यांचा पुन्हा वापर करता येतो.



## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in